लोकमत

# कटकवार विद्यालयात मार्गदर्शन उपक्रम

**साकोली** : स्थानीय कृष्णमुरारी कटकवार विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय साकोली येथे 'सायबर सेक्युरिटी' या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रम आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम क्विक हिल फाउंडेशनतर्फे घेण्यात आला. कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून मानसी शेंडे व पूर्वा लांजेवार, मुख्याध्यापक विजय देवगीकर उपस्थित होते. आजच्या प्रगत युगात सर्वसामान्यांची दिशाभूल करून फसवणूक करण्यात येते. याकरिता नागरिकांनी कसे सावध असावे, याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. मार्गदर्शनात सोशल मीडिया, फ्रॉड कॉल्स, सेफ्टी अबाउट पर्सनल डिटेल इन्फॉर्मेशन बद्दल मार्गदर्शन करण्यात आले. बी.एस. लंजे, संजय पारधी, शिवदास लांजेवार, संजय भेंडारकर, शिवपाल चन्ने, दिनेश उईके, पुष्पा बोरकर आदींनी सहकार्य केले.

Hello Bhandara
Page No. 2 Aug 31, 2024
Powered by: erelego.com